# नियमित दिवाणी दावा नं. ३०/२०२३ मधील नि.२४ वरील आदेश

## (भास्कर साळुबा गायकवाड वि. मनोहर साळुबा गायकवाड)

## (**CNR**:**MHBU**13-000301-2023

१. प्रस्तुतचा अर्ज हस्तक्षेप अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १ नियम ८(अ) प्रमाणे हस्तक्षेप सादर करण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

२. **हस्तक्षेप अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे-**

प्रस्तुत अर्जातील हस्तक्षेप अर्जदार यांनी सदरचे प्रकरण हे वादीने विद्यमान न्यायालयामध्ये प्रतिवादींविरुध्द जाहिर होऊन मिळणे करिता व कायमचा मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. हस्तक्षेप अर्जदार यांचे मुक्काम मौजा चांधई ता. चिखली, जि. बुलडाणा येथील गट क्र. २१८, क्षेत्र १३.७७ हे.आर, आकार ००.४६ रु.पै., हिस्सा १.५१ हे.आर. या मिळकतीपैकी ०.७६ हे.आर. जमिनीवर या हस्तक्षेप अर्जदाराचा निर्विवाद ताबा व वहिती आहे. दि. ०५.०४.१९८० रोजी प्रतिवादी क्र. ५ व त्यांची आई आशा विनायकराव परांजपे यांच्याकडून हस्तक्षेप अर्जदार व दामोधर साळूबा गायकवाड यांनी पंजीबध्द खरेदीखताद्वारे विकत घेतली आहे. त्यानंतर हस्तक्षेप अर्जदार व दामोधर साळूबा गायकवाड यांनी आपसात वाटणीपत्र करुन ०.७६ हे.आर. जमीन ही हस्तक्षेप अर्जदाराच्या हिश्यावर आलेली आहे व ०.७५ हे.आर. जमीन ही दामोधर साळूबा गायकवाड म्हणजे प्रतिवादी क्र. २ यांच्या हिश्यावर आलेली आहे.

३. दावा मिळकती संबंधाने विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट चिखली येथे प्रतिवादी क्र. १ मनोहर साळूबा गायकवाड यांनी रे.दि.मु.नं. ११३/२०१५ मनोहर विरुध्द रेखा हा दावा प्रलंबीत आहे. त्याच प्रमाणे या हस्तक्षेप अर्जदाराने सुध्दा प्रतिवादी क्र. १ व २ तसेच प्रतिवादी क्र. ५ विरुध्द रे.दि.मु.नं. २७/२०१८ हा दावा दाखल केलेला असून सदर दावा सुध्दा विद्यमान न्यायालयात प्रलंबीत आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर वादींनी दाखल केलेला दावा हा या हस्तक्षेप

अर्जदाराशिवाय दाखल केलेला आहे. सदर दावा मिळकतीशी या हस्तक्षेप अर्जदाराचे हितसंबंध निगडित आहे. हस्तक्षेप अर्जदार यांना सदर दाव्यात पक्ष म्हणुन सामाविष्ठ करणे हे वादीचे आद्य कर्तव्य होते परंतु वादीने हेतूपुरस्सरपणे या हस्तक्षेप अर्जदारास सदर दाव्यात पक्ष म्हणुन समाविष्ठ केले नाही. त्यामुळे सदर दाव्यामध्ये या हस्तक्षेप अर्जदारास पक्ष म्हणुन सामाविष्ठ करणे गरजेचे आहे.

**४.** हस्तक्षेप अर्जदार श्रीमती मणकर्णा सदाशिव गायकवाड यांनी कथन केले की प्रस्तुतच्या दाव्यामध्ये ते पक्ष म्हणुन सामाविष्ठ करणे जरुरी आहे. प्रस्तुतच्या अर्जामध्ये कुतूहल आहे. यावर अर्जदाराने आक्षेप घेतला. प्रस्तुतचा अर्जाचे अवलोकन करता माझे असे मत आहे की, प्रस्तुतच्या अर्जामध्ये सदर हस्तक्षेप अर्जदाराने आक्षेप घेतलेला आहे. सदर कामी त्यास पक्ष म्हणुन सामाविष्ठ केले तर अर्जदाराला कसलेही नुकसान होणार नाही. याउलट अर्जाचे निष्कर्ष काढणे उपयोगी होईल. तसेच वादी व प्रतिवादी यांनी सदर अर्ज मान्य केल्यास त्यांचे कसलेही आक्षेप राहणार नाही असे जबाब दिले म्हणुन cost/खर्चा बाबत कसल्याही आदेशाची गरज मला दिसुन येत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुत हस्तक्षेप अर्जदार यांचा नि.२४ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांना निर्देशित करणेत येते की, संबंधित हस्तक्षेप अर्जदार श्रीमती मणकर्णा सदाशिव गायकवाड यांना दाव्यात पक्ष म्हणून सामील करावे व तशी दुरुस्ती अर्जामध्ये करुन दुरुस्त प्रत पुढील तारखेपर्यंत मे. कोर्ट व जाबदार करीता सादर करावी.

Digitally signed by IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2026.02.21 18:29:03 +0530

**चिखली** **(आय. ए. वाय. ए. खान)**

**दिनांक–१८/०२/२०२६** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, चिखली**

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | G.V. Nimje<br>Stenographer Grade III |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Chikhli |
| Date | : | 18/02/2026 |
| Signed by P. O. on | : | 18/02/2026 |
| Uploaded on | : | 21/02/2026 |